भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०७/२०१८

## १) महिलेच्या मनाला लज्जा उत्पन्न होवुन अब्रु नुकसानी व अपमान होईल असे अश्लिल शब्द असलेले मॅसेज प्रसारीत केल्याने गुन्हा नोंद–

दिनांक ०८/०७/२०१८ चे १४.२२ ते १३/०७/२०१८ चे १०.१३ वाजता दरम्यान यातील आरोपी हा भाजपा भंडारा शहर या वॉट्सअॅप ग्रुपचा अॅडमीन असतांना व सदर ग्रुपमध्ये महीला सदस्य आहेत याची आरोपीस जानीव असतांनाही सदर ग्रुपवर आरोपीने नगर परीषद भंडारा सदस्यांना उद्देशुन तसेच महीला नगर सेवीकांचे मनाला लज्जा उत्पन्न होवुन त्यांची निती भ्रष्ट होवुन अब्रु नुकसानी व अपमान होईल अशा उद्देशाने अश्लिल शब्द असलेले मॅसेज प्रसारीत केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५००,५०१,५०४ भादवी. सहकलम ६७ माहीती तंत्रज्ञान अधीनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चव्हाण पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

## २) नौकरी लावुन देण्याची खोटी आमीष दाखवुन लोंकाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद –

दिनांक २४/०७/२०१८ चे ११.००ते १३/०७/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी चा भाचा व ईतर ४३ लोकांची अंदाजे ८२,००,०००/रु. आरटीजीएस द्वारे व नगदी घेवुन लोकसेवक असल्याची खोटी बतावनी करून तशी ओळख धारण करून महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळया पदावर नौकरी लावुन आमीष देवुन खोटी वेबसाईड तयार करून तसेच खोटे दस्ताऐवज तयार करून शासकीय ईमारतीत आपले कार्यालय उघडुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून शासकीय शाळामध्ये परीक्षा घेवुन शासकीय कार्यालयात मुलाखात घेवुन खोटे ज्यॉईनिंग लेटर व अपॉयमेंट लेटर देवुन फसवणुक केली आहे. सदर प्रकरणा बाबत विजय राजेद्र नरसींग व याचेसह यात सहभागी ईतर लोक यांचेवर कायदेशीर कारवाही होणेस करीता फिर्यादी पंकज शिवदास बडवाईक वय ३७ वर्ष रा. सेंट मेरी नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७०,४१९,४२०,४६५,४६७,४७०, ४७३ भादवी. सहकल ६६ (ड) माहीती तंत्रज्ञान अधीनीय अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

## ३) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु: –

दिनांक ११/०७/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील मृतकची अचानक प्रकृती बिघडल्याने औषधोपचारा कामी सामान्य रूग्नालय भंडारा येथे भरती केले असता, उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो व पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाला द्वारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ढेंगळी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नंबरी नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०७/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हे पांलादुर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. रूपचंद वैद्य यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**५) अवैध हा.भ. दारू /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १३/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन साकोली येथे अवैध हातभट्टी दारू/देशी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन हातभट्टी दारू ३१ लिटर कि. ३१,००/रु. तसेच ०८ लिटर २८० मिलीलीटर देशी दारू किमती २,३९२/रु व जुगारातुन किंमती ५,६९१/–रु. असा एकुण ११,१८३/रु. माल जप्त करण्यात आला.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १३/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०९ तीन सिटर वाहनाकरीता– १० ईतर वाहनांवरती – १२४ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.